**नियमित दिवाणी दावा क्र.२३५/२०२२**

मुरलीधर रामभाऊ व इतर

वि.

विठ्ठल नागु व इतर

**MHAH190008762022**

**<u>आदेश निशाणी क्र.२४ खाली.</u>**

**१.** वादी क्र.०३ हे मयत झाल्यामुळे त्यांचे विरुध्द दावा अबेट झाला आहे, सदर अबेटमेंट आदेश सेटअसाईड करण्यासाठी सदरचा अर्ज वादींनी दाखल केला आहे.

**२.** वादीचे कथन आहे की, वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे दिनांक २०/०१/२०२५ रोजी मयत मयत झाले. परंतु, वादी हा आजारी असल्यामुळे त्यांना न्यायालयात येण्यास न जमल्यामुळे सदर मयत वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे सदर वादी विरुध्द दावा अबेट झाला व सदर अबेटमेंट आदेश सेटअसाईड करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

**३.** प्रतिवादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. प्रतिवादी यांनी सदर अर्जास निशाणी क्र.३० अन्वये म्हणणे दाखल केले. त्यांचे मते सदरचा अर्ज कायदेशिर तरतुदीस अनसुरुन नाही, अर्जातील करण हे संयुक्तिक नाही. त्यावरुन प्रतिवादींनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**४.** वादी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले. वादीने अभिलेखावर वादी क्र.०३ चे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली. त्यानुसार वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे दिनांक २०/०१/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते.

**५.** वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई हुकूमासाठी प्रतिवादीं विरुध्द दाखल केला आहे. तसेच वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे मयत झाले असुन अर्जदार वादी हे आजारी असल्यामुळे वादीने सदर अर्ज वेळेत दिला नाही. सदरचा अर्ज दि.१३/०६/२०२५ रोजी दाखल केला आहे. मुदत कायदा अर्टिकल १२० नुसार वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. वादी क्र.०३ यांच्या मृत्यूची तारीख २०/०१/२०२५ रोजी मयत झाले. परंतु त्यांचे वारस वादीने ९० दिवसांत रेकॉर्डवर घेतले नाही. त्यामुळे सदरचा दावा वादी क्र.०३ विरुध्द अबेट

झाला आहे.

**६.** वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे मयत झाले असले तरी त्यांच्या वारसांनां प्रतिवादी विरुध्द दावा चालविण्याचा अधिकार टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दावा परिपूर्णपणे व गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. तसेच दाव्याची बहुविधता टाळण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र.२४ वरील अर्ज रक्कम रु.२००/– च्या कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादीस कॉस्टची रक्कम द्यावी.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.12 11:27:57 +0530

दि.०९/०३/२०२६

( वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,
शेवगाव.